महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अवैधरित्या होत असलेल्या टोल वसुलीबाबत

(१) २७३७३ (१२-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ठरल्याप्रमाणे टोल वसुली पूर्ण झाली असूनही अद्याप वसुली सुरुच असल्याने टोलवसुलीचे कंत्राट दिलेल्या आयआरबी कंपनीस दिनांक ३१ जुलै, २०१९ पर्यंत १५ वर्षात रुपये ४३३० कोटी वसुल करण्याचा अधिकार दिला असताना, सदरहू कंपनीने सुमारे रुपये ६६७३ कोटी टोल वसुली करुन यामध्ये रुपये २४४३ कोटी जादा वसुली करुन आर्थिक गैरव्यहार केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे प्रकल्पासाठी करण्यात आलेला खर्चाची रक्कम आयआरबी कंपनीने टोल वसुली निधीतून पूर्ण झालेला असतानाही, आयआरबी कंपनीने अतिरिक्त केलेल्या टोल वसुलीची रक्कम शासन जमा करुन आयआरबी कंपनीचे टोल वसुलीचे कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई-पुणे महामार्गावरील टोल वसुली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०२२) : (१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व जूना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ या दोन्ही रस्त्यांची सुधारणा करणे व १५ वर्ष सदर दोन्ही रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करणे या कामाची बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मागविण्यात आलेल्या निविदेस प्रतीसाद म्हणून मे.आय.आर. बी. यांनी निविदा सादर केली होती. त्यांनी सादर केलेल्या निविदा प्रस्तावाप्रमाणे त्यांना रुपये ४३३० कोटी इतके पथकर उत्पन्न मिळणे अपेक्षित होते. तथापि, त्यांना रुपये ६६७३ कोटी इतके उत्पन्न मिळाल्याचे दर्शविले आहे. टोल वसूली मध्ये कोणताही आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही.

(२) सदर प्रकल्पाकरिताचे अपेक्षीत पथकर उत्पन्न अद्याप महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मिळालेले नाही. तसेच, सदर प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर पूर्ण करण्यात आला असल्यामूळे व कंत्राटदारा समवेतच्या करारनाम्यात कोणतीही अतिरीक्त रक्क्म शासनास / महामंडळास जमा करण्याची तरतूद नसल्यामूळे आय.आर.बी.कंपनीचे टोल वसुलीचे कंत्राट रद्द करण्याचा प्रश्न उद् भवत नाही.
(३) या प्रकल्पाकरीता महामंडळास मंजूर करण्यात आलेला सवलत कालावधी दिनांक ३०.०४.२०३० पर्यंत असून सद्यस्थितीत पथकर वसुली सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालाड पश्चिमेकडील मालवणी येथील न्यु कलेक्टर कंपाऊड येथील चार मजली इमारत कोसळल्याबाबत

(२) ३१०५३ (१८-०६-२०२१). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड पश्चिमकडील मालवणी गेट क्रमांक ८ येथील अब्दुल हमीद मार्गावर असलेली न्यु कलेक्टर कंपाऊड येथील चार मजली इमारत कोसळून ११ जणांचा मृत्यू व ७ जण गंभीर जखमी झाले असून यामध्ये ६ बालकांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना दिनांक ९ जुन, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे मुंबईतील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असल्याने सदरील घटनेची चौकशी करण्यात आली काय
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेतील मुत्यू व जखमी झालेल्या कुटूंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत तसेच धोकादायक इमारतींबाबत नियमावली ठरवून ठोस अशी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. जितेंद्र आव्हाड (११-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) न्यू कलेक्टर कंपाऊंड, मालवणी गेट नं.८, प्लॉट नं.७२, अब्दुल हमीद मार्ग, मालाड (प), मुंबई येथे दि.०९.०६.२०२१ रोजी तळमजला + ३ मजला असलेले बांधकाम हे समोरील तळमजला + १ मजला असलेल्या बांधकामावर कोसळले. सदर दुर्घटनेत १२ व्यक्तींचा मृत्यु झाला व ०८ जण जखमी झाले होते. सदर दुर्घटनेतील १२ मयत व्यक्तीपैकी एका मयत व्यक्तीच्या वारसाची चौकशी न झाल्याने उर्वरित ११ मयत व्यक्तींना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून एकूण रूपये ४४,००,०००/- व ६ जखमी व्यक्तींना रुपये ३४, २००/- इतक्या रकमेची मदत देण्यात आली असल्याचे तहसलिदार, बोरीवली यांनी दि.२०.१२.२०२१

रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच दि. ०१.०१.२००४ ते दि.३१.१२.२०२० या कालावधीत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड-२ यांच्याकडून मौजे-मालवणी येथील २९४ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली व २३३२० झोपडया निष्कासित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महागरपालिका हद्दीतील मुंब्रा परिसरासाठी कौसा येथे
महापालिकेचे रुग्णालय उभारण्याबाबत

(३) ३२४७० (११-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका हद्दीतील मुंब्रा परिसरासाठी कौसा येथे १०० खाटांचे महापालिकेचे रुग्णालय उभारण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने सन २०१३ मध्ये घेतल्यानंतर आत्तापर्यंत या रुग्णालयाच्या कामावर १४७ कोटी रुपये खर्च करूनही या रुग्णालयाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयासाठी पहिल्यांदा ५४.३८ कोटी, दुसऱ्यांदा ६३.६३ कोटी आणि तिसऱ्यांदा ६३.६३ कोटीच्या निविदा काढून वेगवेगळी कामे करण्याच्या नावाखाली १४७ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, सदरहू खर्च सुमारे पाच पट वाढूनही खाटांची संख्या मात्र १०० इतकीच आहे. या तीनही निविदांची कामे एकाच ठेकेदाराला दिल्याने या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप भाजपच्या नगरसेविका श्रीमती मृणाल पेंडसे यांनी केला असून या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाचे काम प्रत्यक्षात ३० महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित असताना या कामात अक्षम्य दिरंगाई होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच सदरहू रुग्णालय लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेने कौसा रुग्णालय बांधण्याचा निर्णय सन २०१३ या वर्षात घेतला होता. तथापि, प्रत्यक्षात कामास सुरुवात माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये करण्यात आली. सदर रुग्णालयाची टप्पा १ व टप्पा २ मध्ये स्थापत्य कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर रुग्णालय कार्यान्वित करणेसाठी अनुषंगिक/पूरक कामे सुरु असून पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर रुग्णालयाच्या कामावर आजपर्यंत (टप्पा १ व २) साठी रु.११२.२६ कोटी एवढा खर्च झाला असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी टप्पा-१ मध्ये रु.४७.८३ कोटी एवढ्या अंदाजखर्चासाठी निविदा मागविण्यात आली होती. त्यानंतर टप्पा क्र. २ मध्ये रु.६०.६१ कोटी एवढ्या अंदाजखर्चासाठी निविदा मागविण्यात आली होती. सदर रुग्णालय कार्यान्वित करणेसाठी अनुषंगिक/पूरक कामे करणेसाठी रु.२४.९३ कोटी अंदाजखर्चासाठी निविदा मागविण्यात आली आहे. सदरचा निविदा खर्च पाहता खर्च पाचपट वाढला हे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

सदर तिन्ही निविदा रितसर ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आल्या असून त्यामध्ये प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाकारास काम दिले असल्याने या प्रकरणी गैरव्यवहार झाला नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच ठाणे महानगरपालिकेच्या स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक ०१.१०.२०२१ व दिनांक २७.१०.२०२१ रोजी अपेक्षलेली माहिती त्यांना पुरवल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) सदर रुग्णालयाचे काम करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांनुसार निश्चित केलेल्या कालावधीमध्ये कामे पूर्ण करण्यात आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदरचे रुग्णालय टप्प्या टप्प्याने कार्यान्वित करण्याचे नियोजन असून, सदर रुग्णालयामध्ये बाह्यरुग्ण विभागात लसीकरण केंद्र दिनांक १४.०१.२०२२ रोजी सुरु केले आहे. तसेच खालील सुविधा प्राधान्याने सुरू करण्याचे नियोजन असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे:-

* डायलिसिस,
* एक्स-रे
* मदर ॲण्ड चाईल्ड केअर (लेबर ओटी सहीत)

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-शीळ रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्याचे सुरू असलेल्या कामांमधील पलावा चौक येथे अनधिकृत बांधकामाबाबत

(४) ३२४७२ (११-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कल्याण-शीळ रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे सुरु असलेल्या कामांमधील पलावा चौक येथे अनधिकृत बांधकामानजिक उभारण्यात आलेले काम धोकादायक असल्याने विनाविलंब नेस्तनाबूत करण्यात यावे अशा आशयाचे मागणीचे १ सविस्तर पत्र कल्याण ग्रामिण विधानसभा मतदारच्या लोकप्रतिनिधीनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आदी कडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणी बाबत शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे,

(३) अद्यापी सदर मागणीच्यानुषंगाने कोणताही निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासनाने दिनांक २४.०७.२००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे चौपदरीकरण व मजबुतीकरणाचे काम बांधा-वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास उद्योजक म्हणून घोषीत करुन सोपविण्यात आले होते.

सन २००८ मध्ये महामंडळाने रुंदीकरणासाठी आवश्यक असणारी निळजे गावाची जमीन संपादित करुन खरेदी केली होती व जमीन संपादित केल्यानंतर सन २०१० मध्ये या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने पाडली होती.

तद्नंतर भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक वर्दळ लक्षात घेता, शासनाने भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्याच्या कामास शासन निर्णय दिनांक २४.११.२०१७ अन्वये मंजूरी दिली. त्यानुसार महामंडळाने भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्याचे काम हाती घेतले असून या रस्त्यावर पलावा चौक येथे २ उड्डाणपुलाच्या बांधकामात अडचणी आल्याने बांधकाम निष्काशीत करण्याची कार्यवाही कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सहकार्याने करण्यात येत आहे. तसेच, उड्डाणपुलासाठी लागणारी अतिरीक्त जागेची भुसंपादनाची कार्यवाही सुरु असून भूसंपादन झाल्यावर संपादित जागेवरील बांधकामे तोडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, पलावा चौकातील बांधकामे तोडण्यासाठी संबंधीत बांधकाम धारकांनी मा.जिल्हा न्यायालयात याचिका व तद्नंतर अपील दाखल केली असून अपीलाची पुढील सुनावणी दिनांक ०४.०३.२०२२ रोजी असून मा.न्यायालयाच्या निकालानुसार सदर प्रकरणाची पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिळ-भिवंडी रस्त्यावरील काटई येथील टोलनाका कायमस्वरूपी बंद करण्याच्या मागणी बाबत

(५) ३२४७३ (११-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळ-भिवंडी रस्त्यावरील काटई येथील टोलनाका कायमस्वरूपी बंद करण्यात यावा अशा आशयाच्या मागणीचे एक सविस्तर पत्र कल्याण ग्रामिण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्य मंत्री यांना दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पत्रातील मागणीनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास या प्रकरणी कोणता ठोस निर्णय घेतला आहे का,

(४) सदरहू, काटई येथील टोलनाका कायमस्वरूपी बंद करण्याच्या मागणीबाबत शासनाचे धोरण काय राहणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) व (४)

कल्याण ग्रामीण विधानसभेच्या लोकप्रतीनिधींच्या दि. २३ सप्टेंबर २०२१ च्या पत्रा पूर्वीच दि.०९.०३.२०२१ रोजी भिवंडी कल्याण शिळ रस्त्यावरील काटई व गोवे येथील पथकर नाके बंद करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाचे काम करताना मोठया प्रमाणात गौण खनिजाची अवैध उचल केल्याबाबत

(६) ३२५०८ (११-०१-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाचे काम करताना मोठया प्रमाणात गौण खनिजाची अवैध उचल करणाऱ्या कंत्रांटदारांवर दंड लावूनही अद्यापही दंड भरला नसल्याचे माहे सप्टेंबर २०२१ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्हयात महामार्गाचे काम करणाऱ्या ॲपको इन्फ्राटेक लि. या कंपनी विरोधात मालेगांव तालुक्यात पॅकेज क्र.५ अंतर्गत अवैध उत्खनन प्रकरणी रु. ३.५५ कोटीचा दंड ठोठावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलडाणा जिल्हयामध्ये प्रकल्प क्षेत्राबाहेर जाऊन गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्या प्रकरणी पॅकेज क्र.६ काम करणाऱ्या ॲपको इन्फ्राटेक प्रा. लि. कंपनीला गेल्या वर्षी ३२ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता मात्र कंपनीने अद्यापपर्यंत दंड भरलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वर्धा जिल्हयातील सेलुच्या तहसीलदारांनी ॲफकॉन कंपनीला रु. २३८ कोटीचा दंड ठोठावला होता मात्र कंपनीने मा. उच्च न्यायालयातून यावर स्थगिती मिळविल्याची माहीती आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, सदर चौकशीअंती अवैधपणे गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या कंत्राटदारांवर कडक कारवाई करुन दंड वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्पाच्या पॅकेज क्र. ५ जि. वाशीम ईपीसी कंत्राटदार मे. ॲपको लि. लखनऊ यांचेवर तहसीलदार मालेगांव यांनी रु ३,५३,१६,४८०/- इतक्या रकमेच्या दंडाचे आदेश पारीत केलेले आहेत. सदर दंडाच्या आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी (राजस्व) वाशिम यांच्या कडे दंड माफ करण्याबाबत एप्रिल २०२१ मध्ये कंपनी मार्फत अपील दाखल करण्यात आले आहे.
(३) होय, हे अंशत: खरेआहे.
सदर प्रकल्पाच्या पॅकेज क्र. ६ जि. बुलढाणा ईपीसी कंत्राटदार मे. ॲपको लि. लखनऊ यांच्या वर तहसिलदार मेहकर यांनी रु. ३९,०३,२९,९५५/- इतक्या रकमेचा दंड आकारला आहे. सदर

दंडाच्या आदेशा विरूध्द दंड माफ करण्यासाठी कंपनी मार्फत विभागीय आयुक्त (महसूल) अमरावती यांचेकडे अपील दाखल करण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पाच्या पॅकेज क्र. २ जिल्हा वर्धा चे कंत्राटदार मे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेवर तहसिलदार सेलु यांनी एकुण रु. २३८,९९,७२,१४८/- इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला आहे. सदर दंडाच्या आदेशावरुन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपुर यांचेकडे दि. २१.०१.२०२० रोजी रिट याचिका क्र. ४१५/२०२० दाखल केली आहे. सदर याचिकेवरील सुनावणीत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी सदर दंडाच्या वसुलीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.

(५) वरील नमुद केल्याप्रमाणे सदर बाबतची प्रकरणे विविध स्तरांवर न्यायप्रविष्ट आहेत.

(६) ईपीसी कंत्राटात गौण खनिज उत्खननाच्या सर्व आवश्यक परवानग्या प्राप्त करणे व नियमानुसार उत्खनन करणे याची संपुर्ण जबाबदारी ईपीसी कंत्राटदाराची असते. सदर प्रकरण हे गौण खनिजाच्या उत्खननाशी संबंधीत असल्याने पोलीस व महसुल विभागाशी निगडीत आहे. सदर प्रकरणात पोलीस तपास सुरु असून दोषी आढळल्यास संबंधितांवर सदर विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. सदर यंत्रणांमार्फत सदर प्रकरणामध्ये आकारण्यात आलेल्या दंडाबाबतची कार्यवाही करण्यात येत असून त्याची सद्यस्थिती वरील प्रमाणे नमुद करण्यात आली आहे.

(७) वरील नमुद केल्याप्रमाणे सदर बाबतची प्रकरणे विविध स्तरांवर न्यायप्रविष्ट आहेत.

पुणे जिल्ह्यातील खडकवासला येथून जाणाऱ्या प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पामुळे अनेक नागरिक भूमिहीन होत असल्याबाबत

(७) ३२६४१ (११-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला विधानसभा मतदार संघातून जाणाऱ्या प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पामुळे अनेक नागरिक भूमिहीन होत असल्याबाबत माहे सप्टेंबर २०२१ दरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील पुणे रिंग रोड महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०४ जानेवारी २०२१ च्या निर्णयातील रिंग रोड च्या आखणी दरम्यान खडकवासला विधानसभा क्षेत्रातील शेकडो वर्षापूर्वीची रहिवासी घरे, शेत जमीन (बागायती), अल्प भूधारक, विहिरी व बोरवेल, पोल्ट्री, पानंद रस्ते, मंदिरे तसेच प्राण्यांचा ही अधिवास नष्ट होत असून शेतकरी, शेती, जलसिंचन व पिण्याच्या पाण्यासह रहिवासाचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे हे हि खरे आहे काय,

(३) या प्रश्नी स्थानिक आमदार यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना जा.क्र.४०८७ ने दि.१३ सप्टेंबर, २०२१ रोजी लेखी पत्रव्यवहार देखील केला आहे हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. ९२ (8)

श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर पत्र प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत गैरकारभार सुरु असल्याबाबत

(८) ३२७०३ (१७-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि रिसर्च, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन संगणक ॲप्लिकेशन आणि रिसर्च सेंटर, नऱ्हे, पुणे यांच्या शैक्षणिक वापरातील बेकायदेशीर / अनधिकृत / अनियमित / विनापरवाना बांधकाम असलेल्या इमारतींना बेकायदेशीररित्या कोट्यवधी रुपयांचा कर माफ केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या दिनांक १२ डिसेंबर, २०१८ च्या अधिनियम १९६६ च्या कलम-५३ अन्वये नोटीसमध्ये झील एज्युकेशन सोसायटी, मौजे नऱ्हे, पुणे येथील स.नं.३९,४० च्या मिळकतीमध्ये बेकायदेशीर / अनधिकृत / अनियमित / विनापरवाना बांधकाम केल्याचे आढळून आले असतांना निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगर विकास प्राधिकरण यांच्या अखत्यारीतील असली तरी शासनाचे आर्थिक नुकसान होत असतांना ही बांधकामे अनधिकृत असल्याचे माहिती असतांना तसेच जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयाच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिनांक २८ मे, २०१९ च्या प्राप्त माहितीवरून पुणे, झील एज्युकेशन सोसायटीच्या स.नं.३९, ४० या इमारतींना नऱ्हे ग्रामपंचायतकडून करमाफी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मा.उच्च न्यायालयाने झील एज्युकेशन सोसायटीच्या अनधिकृत बांधकामांची ग्रामविकास मंत्री महोदयांनी दोन महिन्यात सुनावणी घेऊन आदेश करणेकामी आदेश दिले असतांना मुदत संपून देखील अद्यापपर्यंत सुनावणी झालीच नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

स. नं. ३९, ४० मौजे नऱ्हे ता. हवेली मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीस CU/नोटीस क्र. ६४६/ पथक क्र. १/ CR-लेखी/ २०१८, दि. १२.१२.२०१८ अन्वये वाढीव बांधकामास नोटीस बजाविण्यास आलेली आहे.

(३) दि. २८ मे, २०१९ च्या प्राप्त झील कॉलेज संदर्भातील माहिती अधिकार अर्जामध्ये संबंधित अर्जदार यांनी उक्त कॉलेज संबंधी कागदपत्रे मागितली होती. त्याअनुषंगाने त्यांस उक्त संचिकेची छायांकित प्रत दिलेली असून सदर संचिकेतील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता ग्रामपंचायतीने या प्रकरणी कोणतीही कर माफी केल्याचे नमूद नाही.

(४) मा. उच्च न्यायालयात झील कॉलेज संदर्भात दाखल रिटपीटीशन क्र. ४७५५/२०२१ मध्ये मा. ग्रामविकास मंत्री याना सुनावणीबाबत कुठलेही आदेश देण्यात आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई-नाशिक महामार्गावरील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांबाबत

(९) ३२८०९ (११-०१-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावरील खाडी पुलावरील रस्त्यांच्या नुतनीकरणाचे काम रस्ते विकास महामंडळाने हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-नाशिक महामार्गावरील मुंब्रा खाडी पूलावर पडलेले मोठे खड्डे तसेच पूलाच्या पुढील रस्त्यावरही मोठे खड्डे पडले असल्याने वाहनांचा वेग मंदावून वाहनांची होत असलेली वाहतूक कोंडी याची पाहणी ठाण्याचे पालकमंत्री यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पहाणीमध्ये पूलांवर व रस्त्यांवर पडलेले मोठ-मोठे खड्डे बुजविण्याचे काम तात्काळ हाती घेण्यात यावेत असे आदेशही पालकमंत्र्यांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(४) मनमाड-नांदगाव रोडवरील (जि.नाशिक) पाणेवाडी, नागपूर दरम्यानच्या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडून अपघाताच प्रमाण माहे मे, २०२१ पासून मोठ्या प्रमाणात वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई-नाशिक महामार्गावरील मुंब्रा खाडीपूल व त्यापुढील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व खड्डे बुजविण्याबाबत निष्क्रिय ठेकेदार व जबाबदार अभियंते यांच्यावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, केंद्र शासनाने मुंबई-नाशिक महामार्गाच्या वडपे ते ठाणे या लांबीत महामार्गाचे आठ पदरी रस्त्याचे रुंदीकरण व उन्नतीकरणाचे कामाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास उद्योजक म्हणून नेमणूक केली आहे. उद्योजकाच्या

करारनाम्यानुसार या रस्त्यावरील वडपे ते ठाणे या २०.७१५ कि.मी.लांबीत रस्ता दुरुस्ती करण्यात आली आहे. या रस्त्यावरील मुंब्रा खाडी पूलावरील खड्डे भरण्याचे काम त्वरित पूर्ण करण्यात आले असून वाहतूकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे जिल्हयांच्या हद्दीत पडलेल्या खड्डयांबाबत व वाहतुक कोंडीबाबत मा.पालकमंत्री, ठाणे यांनी दिनांक २९.०९.२०२१ रोजी पाहणी केली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

मुंबई-नाशिक महामार्गाच्या वडपे ते ठाणे या भागात पावसाळयात अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत पावसाळयात वेळोवेळी भरण्यात आलेले आहेत.

माहे ऑक्टोंबरमध्ये वडपे ते ठाणे संपुर्ण रस्ता व खाडी पूल वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

(४) सदर बाब निदर्शनास आली नाही.

जळगांव-चाळीसगांव-नांदगांव-मनमाड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ जे वरील भाग नांदगाव ते मनमाड (कि.मी.१४७/४२५ ते १६८/८००) या लांबीत ई.पी.सी. तत्वावर कॉंक्रिटीकरणाचे काम मंजूर आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश (Appointment Date) दिनांक २०.१२.२०२१ रोजी मे.राजेंद्रसिंग भांबु इन्फ्रा प्रा.लि.या कंत्राटदारास देण्यात आले आहे व काम प्रगतीत आहे. कामाची मुदत १८ महिने असून प्रस्तावित पुर्णत्वाचा दिनांक १९.०६.२०२३ आहे. बांधकाम कालावधीत सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती संबंधीत कंत्राटदाराने करावयाची आहे व करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले आहे.

(५) मुंबई-नाशिक महामार्गाच्या या विभागाशी संबंधीत वडपे ते ठाणे दरम्यान मुंब्रा खाडी पूल व त्यापुढील रस्ता खड्डे मुक्त करण्यात आला असून वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(६) सदर रस्ता पावसाळा संपताच खड्डे मुक्त करण्यात आला आहे व वाहतुकीस सुस्थितीत आहे. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

लोहा (जि.नांदेड) पालिकेकडून शहराला शुद्ध पाणीपुरवठा करण्याबाबत

(१०) ३२८७९ (१७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) पालिकेकडून सुनेगाव तलावातून आलेल्या पाण्यात केवळ ॲलम मिसळवून टाकीत भरले जात असून तेच अशुध्द पाणी नळाद्वारे संपूर्ण शहरात पुरवठा केल्यामुळे स्थानिक नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलशुध्दी केंद्र परिसरात काटेरी झुडपे व घाणीचे साम्राज्य सर्वत्र पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या जलशुध्दीकेंद्र पसिराची स्वच्छता करण्यासह या जलशुध्दीकेंद्रातून शहराला शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

लोहा शहरास सुनेगाव तलावाच्या खालील बाजूस असलेल्या पाझर विहिरीतून पाण्याचा उपसा करुन पाणी पुरवठा होतो. सदर पाणी जलशुद्धीकरण केंद्रात आल्यानंतर त्यावर प्रक्रिया करुन, तुरटी व ब्लिचिंग पावडर इ. मिश्रीत करुन पाणी निर्जतुकीकरण करण्यात येते. यानंतरच नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.

सदर जलशुद्धीकरण केंद्र परिसरात असणारी झुडपे नियमितपणे काढून स्वच्छता करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(जि.लातूर) अहमदपूर नगरपालिका क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलधारकांना अनुदान वितरीत करण्याबाबत

(११) ३३०५४ (११-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर नगरपालिका क्षेत्रातील (जि.लातूर) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या ३५३ घरकुलधारकांनी त्यांचे प्रलंबित असलेले अनुदान तातडीने वितरीत करावे अशी मागणी दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरकुलधारकांना प्रलंबित अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे काय, असल्यास, कधी करण्यात आले आहे,
(३) अद्याप वाटप केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०९-०३-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) अहमदपूर नगरपरिषदेस डिपीआर क्र.१ मध्ये २११ घरकुलांकरिता राज्य शासनाच्या पहिल्या हप्त्यापोटी रुपये८४.४० लक्ष (दिनांक १६.११.२०१८) व दुसऱ्या हप्त्यापोटी रुपये ८४.४० लक्ष (दिनांक २१.०८.२०२०) असे एकूण रुपये १६८.८० लक्ष इतका राज्य हिश्श्यापोटीचा निधी वितरीत करण्यात आला असून केंद्र शासनाच्या पहिल्या हप्त्यापोटी रुपये१२६.६० लक्ष इतका निधी दिनांक २८.१०.२०२० रोजी वितरीत केला आहे.

तसेच, डिपीआर क्र. २ मधील १४२ घरकुलांकरिता राज्य शासनाच्या पहिल्या हप्त्यापोटी रुपये ५६.८० लक्ष इतका निधी दिनांक ६.०५.२०१९ रोजी व केंद्र शासनाच्या पहिल्या हप्त्यापोटी रुपये ८४.६० लक्ष इतका निधी दिनांक १९.०७.२०२१ रोजी वितरीत करण्यात आला आहे.

अहमदपूर नगरपरिषदनी सदर दोन्ही प्रकल्पांतील सुरु असलेल्या घरकुलांचे Geo Tagging व भौतिक प्रगती अहवाल इ. माहिती PMAY MIS Portal वर upload केल्यानंतर व त्याबाबतचा सविस्तर अहवाल सुकाणू अभिकरणास सादर केल्यानंतर उर्वरित निधी वितरित करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदपूर-खापरटोन (जिल्हा लातूर) दरम्यानच्या महामार्ग रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१२) ३३०७८ (११-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील अहमदपूर-अंबाजोगाई या राष्ट्रीय महामार्गावरील अहमदपूर ते खापरटोन रस्त्याच्या कामाची सन २०१७ मध्ये सुरुवात करण्यात येवून २०१७ ते २०२१ या चार वर्षाचा कालावधी होऊनही सदर रस्त्याचे काम अद्यापही अर्धवट स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यादरम्यान १० ते १२ गावे येत असून या रस्त्यावर कंत्राटदाराकडून स्पीडब्रेकर, रेडियमच्या ठोकळया, स्पीडब्रेकर लायनिंगचा व सुचना फलक, रस्त्याच्या कडेच्या साईटपट्टयाचे मजबुतीकरण, रिफलेटर्स, डिव्हायडर्स इ. कामाचे नियोजन सदर कंत्राटदाराकडून करण्यात आले नसल्यामुळे वारंवार रस्त्यावर अपघाताच्या अनेक घटना घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम शासनाचे आदेशानुसार आवश्यक त्या सर्व सोईसुविधांसह पूर्ण करण्यात यावे अन्यथा कंत्राटदार, कंपनी व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२२) : (१) होय अंशतः खरे आहे,

लातूर जिल्हयातील अहमदपूर -अंबाजोगाई या राष्ट्रीय महामार्गातील प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीपथावर असलेल्या अहमदपूर ते पिंपळा जंक्शन ५४८-डी कि.मी. ०/०० ते ५५/६२३ या रस्त्याच्या कामाचा भाग आहे. प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन ही कि.मी. ०/००० ते ३३/००० अशी ३३ कि.मी. लांबी आहे. अहमदपूर ते (खापरटोन) ते पिंपळा जंक्शन या रस्त्यांच्या कामासाठी मे. मधुकॉन-शारदा-श्री सत्यसाई बाबा कन्स्ट्रक्शन (जेव्ही) कंत्राटदारास दि.१८.०८.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे.

सध्यस्थितीत, सदर प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन या ३३ कि.मी. लांबी पैकी ३२.६०० कि.मी. लांबीचे कॉंक्रीटीकरण करणेचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ०.४०० कि.मी. लांबी ही पुलाची ॲप्रोच लांबी असून सदर काम प्रगतीत आहे. प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन या लांबीमधील १२ पुलांपैकी १२ पुलांचे काम पूर्ण आहे व ३८ मोऱ्यांपैकी (बॉक्स कलव्हर्ट) ३८ मोऱ्यांची कामे पूर्ण झालेली आहेत व सदर प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन या लांबी मधील सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन या ३३ कि.मी. लांबीमधील थर्मोप्लॅस्टिक पेंट, कॅटऑईज रबलिंग स्ट्रीप, सुचना फलके, रिफ्लेक्टर्स इ. रोड फर्निचरची कामे तसेच डिव्हायडर्स व साईटपट्ट्यांचे मजबूतीकरणाची कामे प्रगतीत आहेत. सदर कामे प्राधान्याने पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्रश्नांकित अहमदपूर ते खापरटोन या ३३ कि.मी. मधील सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके अंतर्गत वाणिज्य व औद्योगिक वापराच्या इमारतीचे कर आकारणी करत असताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(१३) ३३०९० (२३-११-२०२१). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत अंतर्गत वाणिज्य व औद्योगिक वापराच्या इमारतीचे कर आकारणी करताना आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.उप आयुक्त, (कर) भिवंडी मनपा, यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी मनपा क्षेत्रातील मालमत्ता करापोटी महापालिकेला कोट्यवधी रुपयांचे येणे असताना मात्र मालमत्ता कर आकारणी करताना व त्यांची देयके संबंधित जागा मालकांना पाठवताना त्यांच्या आकारमान व त्यांचे मूल्य कमी दाखवत असून कोट्यावधी रुपयाऐवजी लाख रुपये आकारले जात असल्याचे तसेच एका व्यावसायिक यांच्याकडून एकपट तर दुसऱ्या व्यावसायिकाकडून तीनपट आकारले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनामार्फत चौकशी करण्यात आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सदर प्रकरणी महापालिकेची फसवणूक करणाऱ्या सबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१), (२), (३) व (४) अशा प्रकारचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

सदर प्रकरणी आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे वस्तुस्थिती कळविली आहे:-

महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता धारक/ भोगवटादार यांनी करआकारणीकरिता सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून व प्रत्यक्ष स्थळ पाहणी अंती मोजमाप घेऊन प्रचलित दरानुसार कर आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कराधान विषयक तरतूदीनुसार भूतलक्षी प्रभावाने कर आकारणी करणे अंतर्गत वाणिज्यिक व औद्योगिक वापराच्या जुन्या मिळकती शोधून कर आकारणी केलेली आहे.

महानगरपालिककेमार्फत केलेल्या कर आकारणीत रु.५.४७ कोटी इतकी कराच्या मागणीत वाढ झालेली निदर्शनास येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कराधान नियमान्वये मालमत्ताधारकांना करयोग्य मूल्यावर/ भांडवली मूल्यावर/आक्षेप अथवा आकारणीत काही बदल असल्यास त्यानुसार कळविण्याची तरतूद आहे.

तसेच महानगरपालिकेनी त्यांच्या क्षेत्रात कर चुकवेगिरी शोधून काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून त्याद्वारे कर आकारणी केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतीचे सर्वेक्षण व त्यावरील कर आकारणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत ही कार्यवाही नियमितपणे करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिके अंतर्गत वर्ग - क व ड च्या भरती प्रक्रियेत अनियमितता होत असल्याबाबत

(१४) ३३०९१ (१७-०१-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत वर्ग-ड च्या सन २०१४ पासून आजतागायत भरती प्रक्रियेत वर्ग-क व ड पदे महानगरपालिकेने जातीय आरक्षणानुसार आतापर्यंत वारसहक्काने भरलेल्या रिक्त पदांमध्ये अनियमितता झाली असल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१४ पासून वारसहक्काने भरलेल्या नोकर भरतीची विभागीय चौकशी करावी अशी मागणी आयुक्त, भिवंडी मनपा यांना दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे ऑक्टोबर २०२१ दरम्यान लोकप्रतिनिधी यांनी घेतलेल्या माहिती दरम्यान सदर वारसहक्काने देण्यात येणारी नोकरी दुसऱ्याच व्यक्तीला दिल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास सदर प्रकरणी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर प्रकरणी महापालिकेची फसवणूक करणाऱ्या सबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) सदर विषयाच्या अनुषंगाने दिनांक २६.१०.२०२१ रोजी निवेदन प्राप्त झाले असल्याचे आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(२) हे खरे नाही.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने सदर प्रकरणी कोणत्याही लाभार्थ्यांना डावलल्याची तक्रार प्राप्त झाली नसल्याची बाब कळविली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुरच्या विठ्ठलाच्या चरणी अर्पण केलेल्या सोने-चांदीच्या वस्तू ठेवण्यास खजिन्यात जागेचा अभाव असल्याबाबत

(१५) ३३१७१ (११-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठलाच्या चरणी भक्तांकडून अर्पण झालेल्या चांदी-सोन्याच्या वस्तू खजिन्यात जागा शिल्लक नसल्याने पोत्यात भराव्या लागत असल्याने व त्या गहाळ वा चोरी होण्याची शक्यता असल्याने मंदिर समितीने त्या वितळवून विटा बनवण्याचा प्रस्ताव गेल्या दोन वर्षापासून विधी व न्याय विभागाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २८ किलो सोने व १९६ किलो चांदी वितळवून विटा बनविण्याच्या प्रस्तावास परवानगी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रस्तावास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१४-०३-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

श्री विठ्ठल रूक्मिणीच्या भक्तांकडून देणगी स्वरूपात सोने-चांदीचे अलंकार, वस्तु अर्पण केल्या जातात. यामधील काही सोने-चांदीच्या वस्तु खुपच लहान असल्यामुळे व त्या वस्तू श्रीस परिधान करता येत नसल्यामुळे अशा सर्व सोने- चांदीच्या वस्तु खजिन्यांमध्ये कापडी पिशवीमध्ये पॅकींग करून कपाटात ठेवल्या जातात. या खजिन्यांमध्ये अत्याधुनिक पध्दतीचे सीसीटीव्ही कॅमेरे व अलार्म सिस्टिम बसविण्यात आली आहे. तसेच या दागिन्यांचा विमा देखील उतरविण्यात आलेला आहे तसेचशासनाच्या दिनांक १७.११.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर या समितीकडे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून दान आलेल्या सोने व चांदीच्या मौल्यवान वस्तू वितळविण्यास स्थायी स्वरुपाने मान्यता दिली आहे. याच शासन निर्णयात या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्यात आली असून कमीत कमी १० किलो एवढ्या वजनाचे सोन्याचे अलंकार साठतील, त्यावेळी शासनाच्या प्रतिनिधी समक्ष व प्रत्येक वेळी शासनास विहितरित्या कळवून कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत. शासनाच्या दिनांक ३.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २६.०२.१९८५ ते दिनांक ३१.११.२०१९ या कालावधीत जमा झालेले अंदाजे २४ किलो सोने व ८० किलो चांदी वितळविण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. शासनाच्या दिनांक ०९.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या दिनांक १७.११.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अनुसरावयाच्या कार्यपध्दतीनुसार विधि व न्याय विभागातील अधिकाऱ्याच्या सेवा या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंचनदी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील
जोडरस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

(१६) ३३२०० (११-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका दापोली, जि.रत्नागिरी नाबार्ड अंतर्गत बांधण्यात आलेल्या पंचनदी येथील पुलाचे काम पूर्ण झाले असून जोडरस्त्याचे काम अदयापही अपूर्ण अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जोडरस्त्याचे काम अदयाप अपूर्ण /रखडण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) तसेच सदरहू जोडरस्त्याच्या कामास भरीव निधीची किती तरतूद करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (१४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) पुलाचे जोडरस्त्याच्या कामास जमिन धारकाने घेतलेली हरकत व या जागेतील खारफुटीची झाडे यामुळे काम अद्याप पुर्ण होऊ शकले नाही.
(३), (४) व (५) - ग्रामीण मार्ग १८ वरील पुलाचे जोडरस्त्याकरीता आवश्यक जागेचे भुसंपादन पूर्ण करुन आवश्यक परवानगी प्राप्त करुन, मंजुरी, निधी व निकषानुसार काम करणेचे नियोजन आहे.

दहिसर येथील टोल नाका बंद किंवा स्थलांतरीत करण्याबाबत

(१७) ३३२२१ (११-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत प्रवेश करताना दहिसर येथे टोल आकारणी साठी टोल नाका उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टोल नाक्यामुळे भाईंदर हून मुंबईला जाताना तसेच मुंबई हून भाईंदरला येताना मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक कोंडी व त्यापासून नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरीत परिणामामुळे सदर टोल नाका बंद करणे किंवा स्थलांतरीत करणे यासाठी मिरा भाईंदरच्या जनतेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर टोल नाका बंद करण्याबाबत किंवा स्थलांतरीत करण्याबाबत स्थानिक प्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर २०२० दरम्यान मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलेली आहे तसेच मा.पर्यावरण मंत्री यांच्यासोबत या विषयी दि.०४ ऑक्टोबर, २०२१ रोजी बैठक घेण्यात आली, हे हि खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर टोल नाका बंद करण्याबाबत किंवा स्थलांतरीत करण्याबाबत करण्यात आलेल्या निर्णयात्मक कार्यवाहीची वा पर्यायी उपाययोजनांची सद्यःस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
दहिसर पथकर नाका परिसरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून मेट्रो-९ (दहिसर ते अंधेरी) प्रकल्पाचे काम चालू असल्याने वाहतुकीची कोंडी होते.
(३) होय, हे खरे आहे,
(४) होय, अंशत: खरे आहे.
मा.आमदार श्रीमती गीता जैन यांनी दिनांक ०१.१०.२०२० रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर मा.विधानसभा सदस्य यांना दि.२५.११.२०२० च्या पत्रान्वये वस्तु:स्थिती अवगत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील अनेक कारखानदारांना महापालिकेने अतिरिक्त कराच्या नोटीसा दिल्याबाबत

(१८) ३३२९५ (०२-०२-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: जळगांव, भुसावळ व ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील शेकडो कारखानदारांना महापालिकेने अतिरिक्त कराच्या नोटीसा दिल्या असल्याची बाब माहे मार्च २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेने मूळ करापेक्षा अधिक कर लावल्यामुळे कराच्या पावत्यांमध्ये दुरुस्ती करून द्यावी तसेच ज्या कंपन्या सन २००२ च्या आधीपासून कार्यरत आहेत त्यांना नियमानुसार कमी कर लागू करावा अशा मागण्या कारखानदारांनी पालिकेकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कारखानदारांनी अभय योजना लागू व्हावी यासाठी पालिकेला पाहिजे असलेली कागदपत्रे देखील सादर केली मात्र देयकामध्ये दुरुस्ती करून देण्याऐवजी जप्तीच्या नोटीसी पाठविण्यात येत असल्याने कारखानदार कोरोना काळात मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महापालिकेने कारखानदारांच्या देयकात तात्काळ दुरुस्ती करून देण्यासाठी व अभय योजना लागू व्हावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९-अ नुसार सामान्य कराच्या २०%, ४०%, ६०% व ८०% किंवा अधिक उर्वरित सर्व कर या नुसार मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

• जळगांव व भुसावळ परिसरातील एमआयडीसी कारखानदारांना अतिरिक्त कराच्या नोटीसा दिल्या, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९-अ नुसार कराची बिले निर्गमित करण्यात आलेली आहेत. सदरची बिले जास्त असलेबाबत डोंबिवली एमआयडीसी परिसरातील मिळकतधारकांनी सन २००२ व त्यापुर्वी निर्धारित केलेल्या मिळकतीच्या करयोग्य मुल्यात सुधारणा करण्याची विनंती केली आहे.

• जळगांव महानगरपालिकेकडे अशा प्रकारची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही तसेच भुसावळ नगरपरिषद कार्यक्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा अथवा कारखान्यांचा समावेश होत नाही.

(३) व (४) सन २००२ व त्यापुर्वीच्या डोंबिवली एमआयडीसी परिसरातील एकूण २२१ कारखानदारांनी करयोग्य मुल्यात सुधारणा करून सर्व्हेक्षणाअंती क्षेत्रफळात दुरूस्ती करण्याचे अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत.

• यापैकी ११ मिळकतींची समक्ष पाहणी करून कराची बिले सुधारित करण्यात आलेली आहेत. तसेच ४८ मिळकतधारकांना कागदपत्रांची पुर्तता करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

• एकूण ३६६ मिळकतधारकांच्या मिळकतींची पाहणी करून कराची बिले सुधारित करण्यात आलेली आहेत. उर्वरित १६२ कारखानदारांच्या कागदपत्रांची शहानिशा करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दि.१५.१०.२०२० ते दि.१५.०१.२०२१ या कालावधीत ७५% व्याज माफिची “अभय योजना-२०२०” जाहीर केली असून, त्यास नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे.

• तथापि सर्वसाधारण सभेने मालमत्ता कर सुधारित केल्याप्रकरणी जादा दिलेली मालमत्ता कराची देयके रद्द करून सुधारीत देयके देण्यात येत असल्याने तसेच त्यावर व्याजाची आकारणी होत नसल्याने अशा मिळकतींना व्याजमाफिची अभय योजना लागू करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

• जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार थकीत मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्यांना दि. १५.११.२०२१ ते दि.२०.०१.२०२२ या कालावधीत शास्ती माफिची अभय योजना लागू करण्यात आली होती. त्यानुसार थकबाकीदारांनी सदर योजनेचा लाभ घेतला असल्याचे, जळगांव महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सर्वोदय छात्रालय (भुसावळ) येथील जागेबाबत बनावट
दस्तऐवज बनवून अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(१९) ३३३०६ (११-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ नगरपालिका हद्दीत सर्वोदय छात्रालय येथील जागेबाबत बनावट दस्तऐवज बनवून जागा बळकवण्याची व त्याजागेवर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबतची तक्रार

मुख्य अधिकारी, भुसावळ नगरपालिका यांच्याकडे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट दस्तऐवज बनवून अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) बनावट दस्तऐवज प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या निर्णयानुसार, भुसावळ शहरातील मिळकत क्र. जुना ४/७०१ व नविन ४/३४७ ही अध्यक्ष, सर्वोदय छात्रालय, भुसावळ यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीमधून मिळकत क्र. ४/३४७/१ ही विभागणी चुकीच्या पद्धतीने झालेली आहे. सदर विभाजित मिळकतीवर श्रीमती वंदना उमेंद्र वाघचौरे यांचा मालकी हक्क हा चुकीच्या पद्धतीने अभिलेखावर नोंदविण्यात आल्याचे, तसेच सदर जागेवर कोणतेही अनधिकृत बांधकाम नसल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. त्यानुसार सदर वादग्रस्त मिळकतीवरुन श्रीमती वाघचौरे यांचे नाव भुसावळ नगरपरिषदेच्या डाटा रजिस्टर व असेसमेंट रजिस्टर वरुन कमी करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जिंतूर (जि.परभणी) नगरपरिषद हद्दीतील ग्रीन पार्क मधील भूखंडाच्या नकाशामध्ये फेरबदल करुन प्लॉटची विक्री केल्याबाबत

(२०) ३३३९३ (११-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात जिंतूर नगरपरिषद हद्दीतील ग्रीन पार्क क्र. एक आणि दोन सर्व्हे क्र.१२२/१ हे भूखंड NA ४४ च्या नजीक असताना मूळ नकाशामध्ये फेरबदल करून उद्यान परिसर, मंदिर यांना राखीव असलेली जागा तसेच रस्त्यांची रुंदी कमी करून शिल्लक असलेली जागा नगरपरिषदेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी संगनमत करून बेकायदेशीररित्या प्लॉट दाखवून विक्री करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वरिष्ठ स्तरावर चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पत्रकारांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा मिळण्याबाबत

(२१) ३३३९९ (११-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारीतेतील पत्रकारांना निर्भिडपणे पत्रकारीता करता यावी व अनेक प्रकरणांना वाचा फोडता यावी याकरीता राज्य शासनाकडून त्यांना संरक्षण मिळण्याच्या अनुषंगाने व त्यांच्या कुटुंबियांमध्ये सुरक्षितेची भावना निर्माण व्हावी याकरीता तामिळनाडू, मध्यप्रदेश, ओडीसा, पश्चिम बंगाल तसेच आंध्रप्रदेश राज्यातील पत्रकारांना त्या-त्या सरकारने दिलेला फ्रंटलाईन वर्करचा दर्जा दिल्याप्रमाणे महाराष्ट्रातील पत्रकारांना देण्यात यावा याकरीता मिरा-भाईदर विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी दि.१० मे, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने काय निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (१६-०३-२०२२) : (१) होय

(२) कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना शासनाच्या विविध विभागातील विविध प्रवर्गातील कर्मचारी यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबध येतो अशा कर्मचाऱ्यांना रु.५० लक्ष रक्कमेचे सर्वकक्ष वैयक्तिक अपघात कवच पुरविण्याबाबत दि.२९ मे,२०२० रोजी वित्त विभागामार्फत शा.नि.निर्गमित करण्यात आला आहे. पत्रकार हे शासकीय कर्मचारी नसून त्यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबंध येत नाही. यास्तव त्यांना फ्रन्टलाईन वर्कर घोषित करुन विमा व इतर लाभ देता येणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुर शहर, उरुळी कांचन, कदमवाकवस्ती लोणी काळभोर या गावांत
झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेबाबत

(२२) ३३४५६ (११-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शहरा नजिक शिरुर शहर, उरुळी कांचन, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर या गावांमध्ये झपाटयाने नागरीकरण वाढत असून येथे झोपडपट्टयांमध्ये मध्ये वाढ होत आहे हे खरे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टयांमध्ये गलिच्छपणा वाढून येथील नागरिक आजारांना बळी आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई मध्ये या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मोठया प्रमाणावर घरे बांधून दिली आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली किती घरे बांधून दिली आहेत,

(५) असल्यास, व्यापारी तत्वावर सुध्दा लागू करणे गरजेचे असल्याने विकसकाकडून जादा रक्कम मिळू शकते, झोपडपटयांच्या विकासासाठी हक्काची घरे मिळणे आवश्यक असून मुंबईच्या धर्तीवर SRA (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण) सारखी योजना शिरुर शहर, उरुळी कांचन, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर या ठिकाणी राबविणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही होत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०७-०४-२०२२) : (१) व (२) उरुळी कांचन, कदमवाकवस्ती व लोणी काळभोर या गावामध्ये नागरीकरण वाढत असून जनगणना झालेली/अधिसुचित झोपडपट्टी दिसून येत नाही.
(३) व (४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी ५,१५,५७४ पुनर्वसन सदनिकांच्या बांधकामाची परवानगी दिलेली असून त्यापैकी एकूण २,२६,९१७ पुनर्वसन सदनिकांचे वाटप केलेले आहे.
(५) व (६) पुणे महानगर प्रदेशाची प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्यात आली असून त्यातील तरतुदीनुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR-२०२०) काही बदलासह प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर नियमावलीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये नियम अंतर्भुत करण्याबाबत विचार करण्यात येईल.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहराचा पाणी टंचाई दूर होण्याकरीता पालघर जिल्ह्यातील सुर्या धरणातून पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

(२३) ३३६७१ (१७-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरातील पाणी टंचाई दूर करण्याकरीता पालघर जिल्ह्यातील सुर्या धरणातून २१८ द.ल.लि. पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने सन २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहा वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत व उक्त प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे व यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे,
(३) व (४) सदर प्रकल्पाच्या वन जमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून २४.०९.२०१९ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाल्याने, तसेच प्रकल्पातील जलशुध्दीकरण केंद्र व जलवाहिनी टाकण्याच्या कामास विविध संघटना व स्थानिक गावकऱ्यांकडून तीव्र विरोध झाल्यामुळे प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत सुरु करता आले नाही.

सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून, प्रकल्पाची भौतिक प्रगती ६५ % इतकी साध्य झाली आहे. सदर प्रकल्प वाढीव कालावधीसह माहे एप्रिल, २०२३ रोजी पर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

तुळजापूर (ता.तुळजापुर, जि.सोलापूर) येथे दिवाणी सत्र न्यायालयाच्या नविन इमारतीच्या जागेबाबत

(२४) ३३७२१ (२३-०२-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापुर, ता. तुळजापुर, जि. उस्मानाबाद येथील दिवाणी सत्र न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी परवानगी दिलेली असल्यामुळे इमारतीच्या बांधकामासाठी लागणारा निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी लेखी पत्राद्वारे शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीच्या बांधकामासाठी रु. ४९,०७,००,०००/- इतक्या निधीचे अंदाज पत्रक पुढील मंजुरीसाठी संबंधित विभागामार्फत शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अंजदा पत्रकास प्रशासकीय मान्यता न मिळण्याचे कारण काय आहेत,
(४) तसेच तुळजापुर येथील सद्यःस्थितीत असलेली इमारत अत्यंत जुनी झालेली असून दैनंदिन कामकाजासाठी अपुरा पडत असल्याने सदरहू प्रस्तावीत नविन इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१६-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदरहू इमारतीच्या बांधकामासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०२२ अन्वये रु.३१.०० कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(३) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(४) हंगरगा (तुळ), ता.तुळजापूर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०२२ अन्वये रु.३१.०० कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
तसेच विधानमंडळाच्या सन २०२२-२३ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सदर इमारतीच्या बांधकामाकरीता प्रथम टप्प्यात रु.३.०० कोटी इतक्या निधीची तरतूद नवीन बाबीद्वारे करण्यात आलेली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापुर तेथे जागतिक स्तरावरील शैक्षणिक हब निर्माण करण्याबाबत

(२५) ३३७२३ (२३-०२-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १३२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा हा आर्थिकदृष्टया मागासलेला जिल्हा असून निती आयोगाने मानव निर्देशांक कमी असलेल्या देशातील निवडलेल्या ११५ जिल्ह्यापैकी एक जिल्हा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानकडे सुमारे रु.१२५ कोटीहून अधिक रक्कम व मोठ्या प्रमाणात खुली जमीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तेथे जागतिक स्तरावरील एज्युकेशन हबची निर्मीती करण्याबाबतची विनंती लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी शासनाकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानामार्फत एज्युकेशन हबसाठी लागणाऱ्या जागेच्या उपलब्धतेबाबत शासकीय जमीन, मठाची जमीन याबाबत माहिती घेऊन नकाशावर Marking करुन घेण्यात आलेली असून, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानाच्या विश्वस्त समितीच्या बैठकीत सादर करण्यात येऊन, त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने तुळजापुर तेथे जागतिक स्तरावरील शैक्षणिक हब निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

परंतु, तुळजाभवानी देवीच्या सेवेसाठी तत्कालीन निजाम शासनाने विविध मठाधीपतींच्या नावे जमिनी इनाम दिलेल्या आहेत. सदर इनाम जमिनीसंबंधी मा. उच्च न्यायालयासह विविध महसुल न्यायालयात प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निर्णय होऊन इनाम जमिनीचा ताबा मंदिर संस्थानाकडे येईपर्यंत शैक्षणिक हबसाठी संस्थानामार्फत जागा उपलब्ध करून देता येणार नाही, असे संस्थानाने कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानामार्फत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शैक्षणिक हबसाठी लागणाऱ्या जागेच्या उपलब्धतेबाबत शासकीय जमीन, मठाची जमीन याबाबत माहिती घेऊन नकाशावर मार्कींग करून घेण्यात आली असून समितीच्या पुढे ठेवण्यात आले आहे. तथापि, याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद शहरातील नगर विकास अंतर्गत चालु असलेल्या विविध विकास कामांबाबत

(२६) ३३७४४ (०२-०२-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरामध्ये नगर विकास विभागाकडून शहरातील विविध विकास कामे मंजुर झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद शहरामध्ये प्रामुख्याने रस्ते, भुमिगत गटारे यांचे कामे मंजुर झालेली असून, सदरहू भुमिगत गटार बांधणे तसेच रस्ते या कामाची निविदा प्रक्रिया नियमानुसार होत नसल्याची तक्रार उपाध्यक्ष नगरपालिका, उस्मानाबाद यांनी लेखी स्वरुपात केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारदारांनी दाखल केलेल्या सर्व मुद्दयांची तपासणी करुन घेण्यात आली आहे काय तसेच त्यामध्ये तक्रारधारकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०४-२०२२) : (१) (२) (३) व (४)

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत उस्मानाबाद शहर भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, नागरी दलितवस्ती योजना, वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत विकास कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.
- मा. उपनगराध्यक्ष, उस्मानाबाद यांनी नगरपरिषद भुयारी गटार प्रकल्पाच्या अनुषंगाने लेखी स्वरुपात उस्मानाबाद नगरपरिषद यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तसेच, याबाबत त्यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली होती.
- तथापि, उस्मानाबाद शहरातील भुयारी गटार प्रकल्पाची निविदा प्रक्रिया ही नियमानुसारच झाली आहे. तसेच, सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने उस्मानाबाद नगरपरिषदेच्या बाजूने निर्णय देण्यात आलेला आहे त्यामुळे सदर तक्रार निकाली निघाली आहे, असे मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी कळविले आहे.

माढेळी वरोरा (जि.चंद्रपूर) राज्य मार्गावर अपघात होत असल्याबाबत

(२७) ३३८०२ (११-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील माढेळी वरोरा राज्य मार्ग ३७१ हा रस्ता वरोरा शहरातून जातो परंतू शहरातील अरुंद, वाहण मार्ग व वळणे यामुळे या मार्गावर अपघात होण्याची शक्यता मोठया प्रमाणावर आहे तसेच या रस्त्यावरुन वेकोली या कंपनीचे कोळसा भरलेले ट्रकची वाहतूक होत असल्याने शहरात वाहतुकीची कोंडी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग १ लक्षात घेता राज्य मार्ग ३७१ या रस्त्याला वळण रस्ता प्रस्ताव प्रस्तावित असुन तद्नुसार दिंडोरा बॅरेज प्रकल्पाच्या पाईप लाईन व रस्त्याच्या कामासाठी संपादीत केलेली खाजगी जमीन रस्त्याच्या बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाला हस्तांतरीत करणे करीता बैठकीचे आयोजन करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१०-०३-२०२२) : (१) अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे वाहतूक कोंडी होते, हे खरे आहे.
(२) संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाने दिनांक २३.०९.२०२१ रोजी बैठक आयोजित केली होती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण भागासह शहरातील गुंठेवारी नियमितीकरण करण्याबाबत

(२८) ३३८२३ (२३-११-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागासह शहरांमध्ये खाजगी जमिनींवर कोणतीही परवानगी न घेता उभारण्यात आलेली घरे व बांधकामे गुंठेवारी योजनेंतर्गत नियमित करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुंठेवारी क्षेत्र नियमित झाले असतानाही काही क्षेत्रांचे नियमितीकरण प्रलंबित असल्यामुळे लोंकाना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुळ कायद्याअंतर्गत विभागीय अधिकारी यांच्या अनुमतीने खरेदी केलेल्या जागेवर बिनशेती न करता त्यावर निवासी प्रयोजनासाठी बांधण्यात आलेली घरे देखील नियमित करण्यात आली असुन सातबारा वरील बिनशेती करण्याचा असलेला शेरा काढण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुख्य मार्गालागत असलेल्या जमिनीचे मालक मागील जागेत असलेल्या घरांना मार्ग देण्याकरीता अडवणूक करित असल्यामुळे गावात वाद निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२२) : (१) व (२) राज्य शासनाने ऑगस्ट २००१ मध्ये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ हा कायदा संमत करून अस्तित्वामध्ये आणला आहे. सदर अधिनियमामध्ये अंमलबजावणीचा दिनांक

वाढविण्याचा निर्णय शासनाने दि.०६.०१.२०२१ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे व त्यानुसार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ मध्ये शासनाने दिनांक १२ मार्च २०२१ रोजी सुधारणा केली असून त्यामध्ये दि.३१.१२.२०२० रोजी अस्तित्वात असलेले गुंठेवारी विकास नियमाधीन करणे व त्यांची श्रेणीवाढ करणेबाबत तरतूद केली आहे.

(३) व (४) गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमानुकूल झालेल्या घरांच्या बांधकामाखालील जमिनी बिनशेती करण्याची आवश्यकता नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत

(२९) ३४०४२ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी शासनाने मुंबई ते सागरी सेतू, मुंबई ते सिंधुदुर्ग जलदगती मार्ग, पुण्याभोवती रिंग रोड आणि नांदेड- जालना द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रत्येक कामासाठी किती निधीची आवश्यकता आहे व निधीचे नियोजन कशा प्रकारे करण्यात आले आहे,

(३) तसेच सदर कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई ते सागरी सेतू, मुंबई ते सिंधुदूर्ग जलदगती मार्ग आणि नांदेड-जालना द्रुतगती महामार्ग, या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून ते पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या किंमतीनुसार प्रकल्पांसाठीच्या आवश्यक निधीचे नियोजन करण्यात येईल.

पुणे पूर्व चक्रकार मार्ग

भाग-१, उर्से ते सोलू	-	रुपये ६६३५.८५ कोटी
भाग-२, सोलू ते सोरतापवाडी	-	रुपये ३५२३.९३ कोटी
भाग-३, सोरतापवाडी ते वरवे	-	रुपये ४४९५.४५ कोटी

पुणे पश्चिम चक्राकार मार्ग

उर्से ते केळवडे	-	रूपये १२,१७६ कोटी
एकूण	-	रुपये २६,८३१ कोटी

पुणे चक्राकार मार्ग प्रकल्पामधील भूसंपादन सेवा वाहिन्या स्थलांतर, व्यवहार्यता तफावत निधी व बांधकाम कालावधीतील व्याज यासाठी लागणारा निधी शासनाकडून व उर्वरित रक्कम खुल्या बाजारातून कर्ज स्वरुपात उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

(३) सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम येत्या ६ महिन्यापर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार बांधकाम हाती घेण्यात येईल. पुर्णे पूर्व चक्राकार मार्ग - सदर कामे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर २.५ वर्षामध्ये पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

म्हाडाच्या कोकण मंडळाने घरे बांधण्यासाठी ठाणे जिल्हयातील विविध भागातील सुमारे २० हेक्टर जमीन देण्याची मागणी

(३०) ३४०४७ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या कोकण मंडळाने घरे बांधण्यासाठी ठाणे जिल्हयातील विविध भागातील सुमारे २० हेक्टर जमीन देण्याची मागणी कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी यांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीवर कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

डॉ. जितेंद्र आव्हाड (२५-०३-२०२२) : (१), होय,

मुंबई महानगर क्षेत्रामध्ये अत्यल्प, अल्प, मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी महसूल व वन विभागाकडे म्हाडा प्राधिकरणाने केलेली आहे.

(२) व (३) अद्याप याप्रकरणी कोणताही निर्णय झालेला नाही.

राज्यात आर्थिक दुर्बल घटक व मध्यमवर्गीयांसाठी पंतप्रधान आवास योजना अंमलात आणण्याबाबत

(३१) ३४३०० (११-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ मध्ये प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे याकरीता केंद्र सरकार ने पंतप्रधान आवास योजना सुरु केली हे खरं आहे का,

(२) असल्यास, ही योजना राज्यात लागू करण्यासाठी व योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त घरे उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच, राज्य शासनाने या योजने बाबत अद्याप पर्यंत किती निधी खर्च केला आहे व किती घरे बांधुन सर्व सामान्य नागरीकांना उपलब्ध करुन दिली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०९-०३-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (ना.) ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी शासनाने खालीलप्रमाणे विविध उपाययोजना केलेल्या आहेत:-

शासकिय जमिनी रुपये १/- प्रती चौ.मी.या नाममात्र दराने वितरीत करण्याबाबत दिनांक १९.०९.२०१६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. तसेच, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटक गटातील व्यक्तींना / लाभार्थींना वाटप करण्यात येणा-या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून रुपये १०००/- इतके निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्याचे शासन आदेश निर्गमित केला आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सार्वजनिक भागीदारी करणेबाबत दिनांक ११.०१.२०१८ रोजी आदेश निर्गमित केला आहे. तसेच, प्रकल्प वेळेवर पूर्ण करणेबाबत अंमलबजावणी यंत्रणाना दिनांक ०३.११.२०२० व दिनांक २६ ११.२०२० या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) सदरहू योजनेअंतर्गत जानेवारी, २०२२ अखेरपर्यंत महाराष्ट्र राज्यातील १२७४ प्रकल्पातील एकूण ११,०६,३५७ घरकुलांना (९,७०,१४० अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) मंजूरी दिलेली आहे. यापैकी एकूण ४,०५,१३६ घरकुलांचे बांधकाम सुरू झालेले असून कर्ज संलग्न व्याज अनुदान (CLSS) घटकाखाली एकूण ४,२१,५१८ लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे.

जानेवारी, २०२२ अखेरपर्यंत मंजूरीप्राप्त घरकुलांना केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये१४०४.०९५ कोटी व राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये १७३८.२४४ कोटी असे एकूण रुपये ३१४२.३३९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील हडपसर मेट्रो प्रकल्पाबाबत

(३२) ३४४६७ (१७-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शिवाजीनगर-हडपसर-लोणी काळभोर व हडपसर ते सासवड रोड अशी मेट्रो मार्गिका प्रस्तावित असून त्यानुसार प्राधिकरणामार्फत, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर ते हडपसर या मुख्य मार्गिकेचा व हडपसर (गाडीतळा) ते सासवड रोड (मंतरवाडी फाटा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन यांना आदेशित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्यामार्फत सद्य:स्थितीमध्ये दोन्ही मेट्रो मार्गिकांचे सविस्तर सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे असे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही मेट्रो प्रकल्पांचे सर्वेक्षण अहवाल दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडे शासनाकडून पाठविण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) :(१), (२), (३) व (४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर-हडपसर -लोणी काळभोर या मुख्य मार्गिकेचा व हडपसर (गाडीतळ) ते सासवड रोड (मंतरवाडी फाटा), पुलगेट ते स्वारगेट या दोन

विस्तारीत मार्गिकांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉ. यांना माहे जून, २०२० मध्ये आदेश देण्यात आले होते. त्यानुसार दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्यामार्फत सद्यस्थितीमध्ये दोन्ही मेट्रो मार्गिकांचे सविस्तर सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात येऊन सदर मेट्रो मार्गिकांचा सविस्तर प्रकल्प अहवाल पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत प्राधिकरणाच्या स्तरावर सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी प्रगतीपथावर असून छाननी प्रक्रियेअंती सदर अहवाल मान्यतेसाठी प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करण्याचे नियोजित आहे. पूर्ण झाल्यानंतर सदर अहवाल मान्यतेसाठी प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

हिंगोली नगर पालिकेला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(३३) ३४६०४ (२३-११-२०२१). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली नगर पालिकेला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची पूर्ण झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभियानांतर्गत रस्त्याकरिता १०१ कोटीचा निधी मंजूर झाला असून यमध्ये ४६ रस्ते सिमेंटचे तर ११ रस्ते डांबरीकरण झाले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून अवघ्या सहा महिन्यातच या रस्त्यावर जागोजागी खडडे पडलेले असून वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत असल्याने, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाच्या रस्त्याचे काम करुन शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी वाया घालवणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू कामात दोषी आढळून आलेल्या ठेकेदारांची देयके तात्काळ थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये १०१.०९ कोटी किंमातीच्या रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

• सदर रस्ते विकास प्रकल्पांतर्गत मंजूर एकूण ५७ रस्त्यांपैकी आजतागायत ४६ सिमेंट रस्त्यांचे व १० डांबरी रस्त्यांचे काम पूर्ण झालेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकल्पांतर्गत ज्या रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत ती अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार योग्य प्रकारे पूर्ण करण्यात आलेली असल्याचे मुख्याधिकारी, हिंगोली नगरपरिषद यांनी कळविले आहे.

• सदर योजनेतील कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले असून त्याबाबतच्या अहवालानुसार योजनेतील कामे समाधानकारक झाल्याचे आढळून आले आहे.
• तसेच, सदर प्रकल्पाचे काम विहित मुदतीत व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, हिंगोली नगरपरिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा स्तरावरील काम वाटप समिती स्थापन करण्याबाबत.

(३४) ३४६७९ (११-०१-२०२२).श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२९ जुलै २०२१ च्याा शासन निर्णयानुसार मजुर सहकारी संस्थांना त्यांच्या ३३% कोटयातील रू.१० लक्ष पर्यंतची कामे मजुर सहकारी संस्थाच्या काम वाटपासाठी सहकार विभागाने स्थापित केलेल्या जिल्हा स्तरीय काम वाटप समिती करेल असे कळविले आहे हे खरे आहे का,
(२) सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना त्यांच्या् ३३% कोटयातील रू.१० लक्ष पर्यंतची कामे सुशिक्षीत बेरोजगार अभियंताना काम वाटपासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांनी स्थापीत केलेल्या जिल्हास्तरीय काम वाटप समितीतर्फे करण्यात यावे असा निर्णय घेण्यालत आला हे खरे आहे काय,
(३) सुशिक्षीत अभियंतांना काम वाटपासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांने जिल्हा स्तरावर काम वाटप समिती स्थापन केली आहे का जर केली असेल तर ती प्रत्येक जिल्हयात कार्यरत आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा स्तरावरील काम वाटप समिती स्थापन करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागांनी कोणती कार्यवाही केली आहे यांचा खुलासा करण्यात यावा, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत किती सुशिक्षीत अभियंत्यांनी यांचा लाभ घेतला यांची यादी शासन सादर करणार काय,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (१५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
(४) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात जिल्हा स्तरावरील काम वाटप समिती मार्फत एकूण १९५३ सुशिक्षीत अभियंत्यांनी लाभ घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नगर पंचायत, वडवणी (जि. बीड) येथील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्यान महाभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत

(३५) ३४६८५ (०२-०२-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर पंचायत, वडवणी (जि. बीड) येथील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्यान महाभियान

अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०४-२०२२) : (१) (२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर वडवणी शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ मार्च, २०२१ रोजी मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य तथा पालकमंत्री बीड यांना दिलेले निवेदन पुढील कार्यावाहीस्तव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले होते.

• त्यास अनुषंगून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड मार्फत सदर विषयाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, वडवणी नगरपंचायत यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता.

• सदर अहवालानुसार वडवणी शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या दर्जाबाबत त्रयस्थ लेखापरीक्षण करण्यात आलेले असून प्रकल्पाचे काम नियमानुसार योग्य असून सदर वडवणी पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका (जि. ठाणे) अखत्यारीतील स्व.मीनाताई ठाकरे रंगायतनच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

(३६) ३४८८६ (०२-०२-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील एकमेव असणाऱ्या स्व.मीनाताई ठाकरे रंगयातन नुतनीकरण करण्याबाबत नगर विकास विभाग यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांना सदर विषयान्वये कामाबाबताचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्याबाबत निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने महानगरपालिका व प्रशासनाद्वारे कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अखत्यारीतील स्व. मीनाताई ठाकरे रंगायतनच्या दुरुस्तीसाठी रु.१० कोटी निधी लवकरात लवकर उपलब्ध करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री महोदयांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकने तसेच शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

* भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने स्व.सौ.मिनाताई ठाकरे रंगायतनाच्या दुरूस्तीसाठी रुपये १३.३५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करुन सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केले होते.
* तथापि, शासनाने रुपये १०.०० कोटीच्या मर्यादेत निधी उपलब्ध करण्याचा शासन निर्णय घेतला असल्याने भिवंडी महानगरपालिकेने फेर अंदाजपत्रक पुनश्च: सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केले.
* तद्नुषंगाने सदर प्रकरणी स्थापत्य कामांस तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून विद्युत विषयक कामांची तांत्रिक मान्यता प्रलंबित आहे.
* भिवंडी महानगरपालिकेचा सदरचा प्रस्ताव दिनांक २७.१२.२०२१ रोजी मंजुरीसाठी शासनास सादर केला आहे. उपरोक्त विषयाबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(जा.नांदुरा जि. बुलढाणा) रेल्वे क्रॉसिंगवर (आर.यू.बि.)
भुयारी मार्ग कार्यान्वित करण्यास मंजुरी देणेबाबत.

(३७) ३५२२५ (११-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर असलेल्या तसेच रेल्वे लाईन वर असलेल्या नांदुरा शहरातील वाहतुकीमुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी रेल्वे क्रॉसिंगवर भुयारी मार्ग कार्यान्वित करणे संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी अथवा त्यादरम्यान मागणी केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संदर्भात शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईचे स्वरूप काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नांदूरा जिल्हा बुलडाणा येथील रेल्वे क्रॉसिंगवर भुयारी मार्ग मंजूर करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (MRIDCL) यांनी भुयारी मार्गाची व्यवहार्यता तपासली असून, भुयारी मार्ग व्यवहार्य नसल्याने भुयारी मार्गाऐवजी उड्डाणपुल बांधण्याचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण / रस्ते वाहतुक आणि राजमार्ग मंत्रालयास मंजूरीसाठी सादर केला आहे.
या उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी सर्व निधी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण/ रस्ते वाहतुक आणि राजमार्ग मंत्रालयामार्फत अपेक्षीत आहे. अद्याप मंजूरी व निधीची पूर्तता झालेली नाही.

वाशिम शहरातील भूमिगत गटार योजनेत अनेक त्रुटीमुळे योजना रद्द ठरल्याबाबत

(३८) ३५२८० (०२-०२-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरात काही वर्षापुर्वी भूमिगत गटार योजना राबविण्यात आली मात्र यामध्ये अनेक त्रुटी राहील्यामुळे ही योजना रद्द ठरवून या गटाराचे पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भूमिगत गटार योजनेवर कोटयावधी रुपये खर्च करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०४-२०२२) : (१) (२) (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ३४.८१ कोटी किंमतीच्या वाशिम शहर भूमिगत गटार प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली होती.

• सदर प्रकल्पाचे काम मार्च, २०१७ मध्येच पूर्ण झाले असून सद्यस्थितीस प्रकल्प कार्यान्वित आहे.

• माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे शहरातील भूमिगत गटार प्रकल्पाच्या काही चेंबरमध्ये कचरा, गाळ अडकून चेंबर ब्लॉक झाल्याची बाब नगरपरिषदेच्या निदर्शनास आली होती. त्यास अनुषंगून नगरपरिषदेस प्राप्त तक्रारीप्रमाणे काही ठिकाणी चेंबर पाईप लाईनमध्ये कचरा, गाळ यामुळे ब्लॉकेज निर्माण होऊन काही ठिकाणी सांडपाणी रस्त्यावरून वाहत होते. मात्र, सदर तक्रारीची नगरपरिषदेमार्फत तात्काळ दखल घेऊन तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.

नागपूर येथे स्मार्ट सिटी प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याबाबत

(३९) ३५३८० (०२-०२-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील भरतवाडा, पारडी, पुनापूर या भागात ९,७३० एकर क्षेत्रात स्मार्ट सिटी प्रकल्प उभारला जात आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात अनेकांची जागा व घरे गेली असून अनेकांना त्याचा मोबदला व घरे मिळालेली नसून जागेचे मोजमापही झालेले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला व आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांची घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०४-२०२२) : (१) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित क्षोधिष्टीत विकास या घटकांतर्गत मौजा पारडी, भरतवाडा, पूनापूर व भांडेवाडी येथील १,७३० एकर क्षेत्रामध्ये शासनामार्फत नगररचना परियोजना मंजूर करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार सदर नगररचना परियोजनेंतर्गत प्रस्तावित रस्त्यांची विकास कामे नागपूर विशेष उद्‌देश वहानामार्फत करण्यात येत आहे.
• सद्‌यस्थितीत ज्या रस्त्याच्या लगत प्रकल्प बाधितांचे सर्वेक्षण होवून मोबदला अनुज्ञेय झाला आहे, अश्या ठिकाणी रस्त्यांची विकासकामे सुरु करण्यात आलेली आहेत. उर्वरीत प्रस्तावित रस्त्यांच्या ठिकाणी सर्वेक्षण व मोजमाप करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
• प्रस्तावित रस्त्याच्या विकासकामांमुळे बाधित होणाऱ्या मिळकती / जागेची मोजणी होऊन नागपूर विशेष उद्‌देश वहनाच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार प्रकल्पबाधितांना मोबदला देण्यात येत आहे.
• मौजा पुनापूर येथे हौसिंग फॉर डिसहाऊस्डसाठी आरक्षित असलेल्या जागेवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

पुणे जिल्हयातील रिंगरोड प्रकल्पाच्या पश्चिम मार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४०) ३५५५२ (१७-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या रिंगरोडवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आरक्षण टाकल्यामुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे दि.२८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिणामी भूसंपादनानंतर प्रकल्पबाधितांना मोबदला कोण देणार असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याशिवाय पुण्याच्या भोवती पूर्व आणि पश्चिम भागात रिंगरोडमध्ये जाणाऱ्या सुमारे ३२ टक्के जमिनी बागायती आहेत, त्यामुळे या प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या प्रकल्पातील बाधितांमधील संभ्रम दूर करुन या प्रकल्पासाठी कमीत कमी बागायती जमिनी संपादित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे
(२) नाही, हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे
(४) पुणे रिंगरोडची आखणी निश्चित करताना कमीत कमी बागायती शेतजमीन बाधित होतील अशी आखणी निवडण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ता. दौंड व ता. हवेली (जि. पुणे) येथील मुळा मुठा नदी प्रदूषणात रोखण्यासाठी भुयारी गटार योजना राबविण्याबाबत

(४१) ३५७६७ (२५-११-२०२१). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता. दौंड व ता. हवेली, जि. पुणे, महानगरपालिका, ग्रामपंचायत हद्दीतून दररोज लाखो लिटर सांडपाणी थेट मुळा मुठा नदी पत्रामध्ये सोडले जात असल्याने पाणी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे जानेवारी २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुठा नदीचे पाणी पुढे शुद्धीकरण करून पिण्यासाठी वापर होत असतांना भुयारी गटार योजनांच्या अभावामुळे लाखो लिटर सांडपाणी नदीत सोडल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुठा नदीचे वाढते प्रदूषण रोखण्याबाबत तसेच जिल्हा परिषद, महानगरपालिका हद्दीतील भुयारी गटार योजना राबविण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) हे अंशतः खरे आहे.
• पुणे शहरात आजमितीस सुमारे ८८३ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन एवढे मैलापाणी निर्माण होते. दैनंदिन सुमारे ५६७ दशलक्ष लिटर्स स्थापित क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामार्फत मैलापाणी शुद्धीकरण करण्यात येते.
• मुळा-मुठा नदीमध्ये विना प्रक्रिया जाणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करणेकमी राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत ५५ कि.मी. लांबीच्या मुख्य मलवाहिन्या टाकणे व शहरात विविध ठिकाणी ३९६ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन क्षमतेची ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार आहेत. यासाठीची निविदा प्रक्रिया पुणे महानगरपालिकेमार्फत अंतिम टप्प्यात आहे.
(२) (३) व (४) पुणे महानगरपालिका हद्दीतील जलकेंद्रामध्ये धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया करूनच पाणी पिण्यासाठी पुरविण्यात येत आहे.
• पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील निर्माण होणाऱ्या मैलापाण्यामुळे मुठा नदीत होणारे प्रदूषण रोखण्याकरिता मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्प व नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी मैलापाणी विषयक प्रकल्प पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.

• ग्रामीण भागातील सांडपाण्यामुळे नदीचे पाणी काही प्रमाणात प्रदूषित होत असून ग्रामीण भागातील सांडपाणी हे त्याच ठिकाणी ग्रामपंचायतीमार्फत शोषखड्डे,वैयक्तिक कुटुंबाचे शोषखड्डे घेऊन तसेच काही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एस.टी.पी.) करून योजना राबविण्यात येते. तसेच, ज्या ठिकाणी अंतिम प्रक्रिया करणे प्रलंबित आहे अशा गावांचे नियोजन सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत निधीची उपलब्धता विचारात घेऊन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

हदगाव नगर परिषद (जि.नांदेड) येथे रोजंदारी कामगार व कर्मचारी यांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधी (EPF) ची कपात झालेली रक्कम शासनाकडे वर्ग करण्याबाबत

(४२) ३५८६५ (१७-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव नगर परिषद (जि. नांदेड) येथील रोजंदारी कामगार व कर्मचारी यांच्या वेतनातून सन २९१५ ते २०१९ दरम्यान भविष्यनिर्वाह निधीची रक्कम प्रत्यक्षात कपात करुन नगरपरिषद प्रशासनाने शासनाकडे भरणा केला नसल्याची बाब नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हदगाव नगर परिषदेतील रोजंदारी कामगार व कर्मचारी यांच्या EPF रकमेचा भरणा न केल्याने संबंधितांच्या झालेल्या आर्थिक नुकसान व मानसिक त्रासाबद्दल नगरपरिषद प्रशासनातील संबंधित दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त कालावधीतील रोजंदारी कामगार व कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधीचा भरणा करवून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हदगाव नगरपरिषदेतील रोजंदारी कर्मचारी यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम माहे मार्च, २०१५ पर्यंत संबंधित विभागाकडे बँकेत चलनाद्वारे भरण्यात करण्यात आलेली होती. एप्रिल, २०१५ पासून संबंधित रक्कम नेट बँकिंग स्वरुपात भरणे अनिवार्य करण्यात आले. यामुळे सदर रक्कम भरणा करणे शक्य झाले नाही. तथापि दि.१५.११.२०२१ रोजी नेट बँकिंग सुविधा उपलब्ध झाली असून, सदर रक्कम कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी (E.P.F.) मध्ये नेट बँकिंग सुविधेद्वारे नगरपरिषदेने भरणा केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नगर पंचायत भिवापुर (जि.नागपूर) येथील पाणी पुरवठा योजनेचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

(४३) ३५८८६ (१७-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजु पारवे (उमरेड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर पंचायत भिवापुर (जि.नागपूर) येथे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतुन जलशुद्धीकरणासह एकुण १७ कोटी ७० लक्ष रुपये किमतीची पाणी पुरवठा योजना सन २०१८ मध्ये मंजुर करुन काम सुरु करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कंत्राटदाराच्या दुर्लक्षामुळे मागील ३ वर्षापासुन पाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याने भिवापूर शहरातील नागरीकांना स्वच्छ, शुद्ध पिण्याच्या पाण्यापासून वंचीत रहावे लागून पाण्याच्या टँकरवर अवलंबुन रहावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणी पुरवठा योजनेचे काम दिलेल्या मुदतीत पुर्ण होण्याचे दृष्टीने कामास विलंब करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) (२) (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये १७.७० कोटी किंमतीच्या भिवापूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली असून योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

• सद्यस्थितीस भिवापूर शहरात जुनी ग्रामपंचायत कालीन पाणीपुरवठा योजना सुरु आहे. सदर योजनेत १० बोअरवेलद्वारे शहरात पाणी पुरवठा करण्यात येतो.

• बोअरवेलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास बोअरवेल दुरुस्ती होईपर्यंत शहरातील त्या त्या भागामध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे नगरपंचायत मार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पाची एकूण भौतिक प्रगती ९० % झालेली असून ३० एप्रिल, २०२२ पर्यंत संपूर्ण प्रकल्पाचे काम पूर्ण करून शहरास नियमित पाणीपुरवठा करण्याचे भिवापूर नगरपंचायतीचे नियोजन आहे.

मुंबई ते सिंधुदुर्ग या दरम्यानच्या ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पाचे बांधकामाबाबत

(४४) ३६०२२ (११-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुंबई ते नागपूर समृध्दी महामार्गाचे धर्तीवर कोकणाच्या विकासासाठी मुंबई, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्हयांना जोडणारा ४०० कि.मी.लांबीचा ग्रीनफिल्ड महामार्ग बांधण्याचा निर्णय माहे मार्च, २०२० मध्ये मा.मुख्यमंत्री यांनी विधीमंडळात घोषित केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत समितीने या प्रकल्पास मंजूरी दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याबाबतचा शासन निर्णय त्याचदिवशी निर्गमित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्ग प्रकल्पाचे कामासाठी एकूण किती जमीन संपादीत करावी लागणार असून कामाची सुरुवात केव्हांपर्यंत करण्यात येणार आहे व महामार्गाचे काम केव्हांपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,
(४) तसेच सदर ग्रीनफिल्ड महामार्ग बांधकामाबाबत शासनाचे नियोजन व विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या अर्थसंकल्पिय भाषणात दिनांक १४ मार्च, २०२० रोजी कोकण द्रुतगती महामार्गाचे बांधकाम करण्याचे घोषित केले होते.

(२) दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंत्रीमंडळ पायाभूत समितीने या प्रकल्पास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा तर्फे हाती घेण्यास मंजूरी दिली असून, त्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक खाक्षेस-२०२१/प्र.क्र.२४७/रस्ते-८, दिनांक ०६.०९.२०२१ निर्गमित केला आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी तांत्रिक अभियांत्रिकी व वित्तिय सुसाध्यतासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून सर्व्हे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्गत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नगरपरिषद उमरखेड, जि.यवतमाळ पाणीपुरवठा योजनेबाबत

(४५) ३६०३८ (१७-०१-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नगरपरिषद उमरखेड, जि.यवतमाळ पाणीपुरवठा योजनेबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्य मंत्री यांच्या दालनात बैठक आयोजित करण्याचे निवेदन देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) (२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियांतर्गत उमरखेड जि. यवतमाळ शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाच्या पत्रासोबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन या विभागास प्राप्त झाले आहे.

• तथापि, सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने बैठकीची तारीख व वेळ निश्चित झाल्यानंतर या विभागास कळविण्यात येईल असे मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाकडून या विभागास कळविण्यात आले आहे.

सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुरू असलेली अनेक कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

(४६) ३६०७१ (१७-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात स्मार्ट सिटीच्या माध्यमातून लक्ष्मी मंडई येथे दत्त जोगिया नव्या रस्त्याचे सिमेंट क्रॉक्रिटीकरण करण्यात आले असून, या रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे कॉंक्रेट रस्त्याच्या मधून पाणी वाहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी खोदकाम करताना जी नळजोडणी तुटलेली होती त्यांची दुरुस्ती न करता सदर रस्ता सिमेंट कॉक्रीटने तयार करण्यात आला त्यामुळे स्मार्ट सिटीच्या कारभारामुळे पाण्याची नासाडी होत असून रस्त्याची दुरावस्था झाली असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कामाचा दर्जा अबाधित राहण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत सोलापूर शहरातील १०.८ किमी लांबीच्या रस्त्याचा पुनर्विकास करून रस्ते कॉंक्रीटीकरण करण्याच्या प्रकल्पाचा समावेश आहे.

सदर प्रकल्पाकरीता लागणाऱ्या साहित्याच्या गुणवत्तेचे लेखापरिक्षण करून घेण्यात आलेले आहे, त्यामुळे सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा निकृष्ट नाही.

(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर स्मार्ट सिटी यांचेकडून प्राप्त अहवालात नमुद केल्यानुसार, सदर रस्ते कॉंक्रीटीकरण करण्याच्या प्रकल्पांतर्गत रस्त्यालगतचे युटिलिटी टाकणेचे काम प्रगतीपथावर असताना घरगुती नळ कनेक्शन तुटल्याने काही काळाकरीता पाण्याची गळती होऊन पाणी रस्त्याच्या कडेने होते. सदर नळ कनेक्शन मक्तेदारास सांगून तात्काळ दुरुस्त करून घेण्यात आले व त्यानंतर आजपर्यंत सदर रस्त्यावरून कुठल्याही प्रकारे पाणी वाहत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. सबब पाण्याची नासाडी होत नाही.

पंढरपूर ते सांगोला महामार्गावर कासेगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) हद्दीतील रस्त्याच्या कामाबाबत

(४७) ३६०९३ (११-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर ते सांगोला महामार्गावर कासेगाव (ता.पंढरपूर) हद्दीतील रस्त्याच्या कामाबाबत वनविभागाने हरकत घेतल्यामुळे ७०० मीटर रस्त्याचे काम मागील ३ वर्षापासून रखडल्याने दैनंदिन ये जा करणा-यांना नागरिकांना मोठा फटका बसत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास रोको केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नासंबंधी वनअधिका-यांची चौकशी होवून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम ३ वर्ष अडवणाऱ्या वन अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्यस्थिती काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) वनजमीन वळतीकरण प्रस्तावावर, केंद्र शासनाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयामार्फत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्याची पूर्तता दि. २५.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली होती. सद्यस्थितीत वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांच्याकडून त्रुटी कळविण्यात आल्या होत्या त्याची पूर्तता दि. ०२.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहराच्या स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत पब्लिक शेअरिंग सायकल प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

(४८) ३६३०७ (२५-११-२०२१). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत सुमारे दीड वर्षापूर्वी २८.२३ कोटी रक्कमेचा पब्लिक शेअरिंग सायकल प्रकल्प सुरू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार नाशिक म्युनिसिपल स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. कंपनीकडून राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तसेच निविदेची रक्कम, सायकल दुरुस्ती व देखभाल खर्च, १ हजार सायकली खरेदीचे नियोजन व त्यासाठी आलेला खर्च, ५० सायकल स्टॅंड व जीपीएस प्रणालीकरिता करण्यात आलेला खर्च, प्रकल्प दुरुस्ती व देखभालीकरिता आलेला खर्च, शिल्लक राहिलेला निधी तसेच खरेदी केलेल्या १ हजार सायकलींपैकी सद्य:स्थितीत किती सायकल शिल्लक आहे याबाबत शहरातील सेवाभावी संस्थांच्या सदस्यांनी सदर कंपनीकडून मागविलेली माहिती देण्यास कंपनीकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचेही दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत शहरात किती सायकल सुरू आहेत तसेच यावर किती खर्च करण्यात आला याबाबत नाशिक महानगरपालिका प्रशासनाकडून समाधानकारक माहिती मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पाच्या २८ कोटी रुपयांच्या रक्कमेपैकी प्रकल्पाचे मुलभूत सोई-सुविधांसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) ८ कोटी रुपयांचा खर्च गृहीत धरला तर १ हजार सायकलीसाठी २० कोटी म्हणजेच १ सायकलसाठी २ लाख इतका खर्च झाल्याचे आढळून येते आहे तसेच सदर स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी अनेक लोकप्रतींनिधींनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर महत्वाकांक्षी स्मार्ट सिटी प्रकल्पातील गैरव्यवहारा प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करून दोषी असणाऱ्या संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०४-२०२२) : (१) केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नाशिक शहरात पब्लिक शेअरींग सायकल हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारी या तत्वावर सुरु करण्यात आला होता.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार, पब्लिक शेअरींग सायकल हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर चालविण्यात आल्यामुळे या प्रकल्पाकरीता नाशिक विशेष उद्देश वहनास कोणताही खर्च आलेला नाही.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी यांचेकडून पब्लिक शेअरींग सायकल प्रकल्पाच्या कंत्राटदाराने प्रकल्पाच्या अटी शर्तीचा भंग केल्याने सदर कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करून त्याची अनामत रक्कम जप्त केल्याचे कळविण्यात आले आहे.
• सदर प्रकल्पांतर्गत सायकल, सायकल स्टँड, सायकल वहनासाठी वाहने इत्यादी साहित्य जप्त करून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आले आहे.
(४) व (५) मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार, पब्लिक शेअरींग सायकल हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर चालविण्यात आल्यामुळे या प्रकल्पाकरीता नाशिक विशेष उद्देश वहनास कोणताही खर्च आलेला नाही. त्यामुळे, त्याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.

औसा विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांची झालेली दुरवस्था.

(४९) ४३५६५ (१०-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदारसंघातील रस्त्याची दूरवस्था झाल्याने वाहतुकीस गैरसोयीचा असल्याने सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पात व सदर वर्षातील पुरवणी अर्थसंकल्पात कामे समाविष्ट करून निधी मंजूर करण्यासाठी आणि रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनास वेळोवेळी प्रस्तावित केली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्तावित कामांना मंजूरी देण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे २०२०-२०२१ मध्ये सातत्याने निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२० ते आजतागायत किती निधीची कामे प्रस्तावित केली असून त्यापैकी औसा स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याबाबत व मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे.
(४) नसल्यास, सदरील कामांचा समावेश अर्थसंकल्पात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) : (१) होय.हे खरे आहे.
(२) होय.हे खरे आहे.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सन 2020 ते आजतागायत एकूण रु.50.03 कोटी इतक्या रक्कमेची कामे अर्थसंकल्पित केली आहेत.
(४) व (५) उर्वरित कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण, निकष, अग्रक्रम व निधी उपलब्धतेच्या मर्यादा यांच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

गट अ व ब पदाच्या अधिकारी यांच्या नियुक्ती व बदलीसाठी पती पत्नी एकत्रीकरण व आपआपसात बदलीस मान्यता देण्याबाबत

(५०) ४३८८७ (२८-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक १४ जुलै २०२१ नुसार महसूल विभाग वाटप नियम २०२१ मध्ये महसूल विभाग बदलून मिळण्याबाबतची तसेच आपआपसात त्या त्या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या तसेचपती पत्नी एकत्रीकरण अंतर्गतची महसूल विभाग वाटप नियम २०१५ मधील बदलीची तरतूद वगळली असल्याने प्रशासकीय सेवेतील महिला कर्मचारी यांची कायमस्वरूपी कौटुंबिक गैरसोय होणार असल्याने सदरील तरतूद पुनश्च समाविष्ट करण्याबाबत औसा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

श्री. उद्धव ठाकरे (०७-०४-२०२२) : (१) प्रश्नात उल्लेखिलेल्या निवेदनाची तारीख दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ असल्याचे नमूद केले असल्याने सदर निवेदन प्राप्त होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मात्र यापूर्वी सामान्य प्रशासन विभागास अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झालेल्या निवेदनांमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.